# प्रा. राम मेघे महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा



अमरावती दि.१३ : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथे राष्ट्रीय युवा दिन स्वामी विवेकानंद जयंती म्हणून साजरा करण्यात आला. या दोन दिवसीय कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी कॉलेजच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स स्टुडंट चॅप्टरच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष दान करून वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचे काम केले. त्यानंतर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. ज्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी युवा दिनासंदर्भात विविध विषयांवर आपले मनोगत व्यक्त केले. वक्तृत्व स्पर्धेत सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत गौरी गारोळे हिने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले. हर्ष कोल्हे हिला रौप्य तर श्रावणी कळंबे हिला कांस्य पदक मिळाले.

दुसऱ्या दिवशी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर व्याख्यान आयोजित करण्यात आले असून यामध्ये विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष रवी मांडवेकर आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद अमरावतीचे केंद्रीय मंत्री समर्थ रागीट यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही वक्त्यांनी विद्यार्थ्यांना स्वामीजींनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे धर्मोपदेशक डॉ.गजेंद्र बमनोटे यांनी देशाचे वर्तमान व भविष्य सांगून स्वामी विवेकानंदांप्रमाणे देशासाठी काम करण्याची युवा पिढीला प्रेरणा दिली.

डॉ.शिरीष देशमुख, डॉ.निक्कू खालसा, डॉ.अनूप शिरभाते, डॉ.सी.आर.पाटील, डॉ.शिरीष पट्टलवार, डॉ.राजेश कुबडे, डॉ.मंगेश गद्धे, डॉ.प्रांजली देशमुख, प्रा. नुपूर येवले, प्रा.कुचे, प्रा.गजानन पाटील, प्रा.अंकुश कडू, प्रा.अक्षय उटाणे, प्रा.आशय रोकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी मंडासे, वेदांत केकडे, सार्थक मुंडवाईक यांनी केले तर आभार आयुषी महल्ले यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयकुमार जोशी, डॉ. सार्थक मुंडवाईक, अनिकेत जांदळ, रोहित जगदाळे, उज्वल मेश्राम, आदित्य नांदेकर, पूर्वा मते, सेजल सांभे, शिरीन पावडे, वैदेही रीठा, यश वानखडे, वैष्णवी धर्मे, विराज कराडे, हेमंत भोंबे यांनी अथक परिश्रम घेतले.